# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/परिपत्रकीय समिती/निनिअ नियुक्ती निकष/९५५२ /२०२० दिनांक :२५/ ५/२०२०

## -: परिपत्रक :-

**वाचावे:-** १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ कब (२)

२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम १२, नियम ७५ व नियम ७६

३. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ चे नियम ३(५)

४. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब अधिसुचना दिनांक ०६.०८.२०१८ रोजी प्रसिध्द झालेले महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) (प्रथम सुधारणा) नियम २०१७

५. प्राधिकरणाकडील परिपत्रक जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-१४/निनिअ नियुक्ती/५३६४/२०१७ दि.३१/०८/२०१७

६. प्राधिकरणाकडील शुध्दीपत्रक जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-१४/निनिअ नियुक्ती/१७६३/२०१८ दि.१२/०३/२०१८

७. प्राधिकरणाकडील परिपत्रक जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-१४/निनिअ नियुक्ती/३४२९/२०१९ दि.२८/०३/२०१९

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ चे नियम १२ अन्वये अ ,ब,क व ड वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांचे संचलन करण्यासाठी संबंधित जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांचेकडुन निवडणुक निर्णय अधिकारी नियुक्तीबाबतचे प्रस्ताव राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास सादर करण्यात येतात.तथापि, निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा नियुक्तीचा प्रस्ताव सादर करताना संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती असलेले ठिकाण व संस्थेचे मुख्यालय यामधील अंतराचा विचार केला जात नाही. त्याचप्रमाणे अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव सादर करतांना निवडणुकीचे किती कामकाज प्रलंबित आहे अथवा सदर अधिकारी / कर्मचाऱ्यांकडे त्याचवेळी इतर किती निवडणुकांचे कामकाज सुरु आहे याबाबीचाही विचार केला जात नाही. त्याशिवाय प्रस्तावित अधिकारी / कर्मचारी याने यापुर्वी त्यास देण्यात आलेल्या निवडणुकांचे कामकाज नियमातील तरतुदींना अनुसरुन काटेकोरपणे पुर्ण केले अथवा नाही याचीही खात्री केली जात नाही. अनेकवेळा पात्र नसलेल्या कनिष्ठ संवर्गात कार्यरत कर्मचाऱ्यांना मोठया आकारमानाच्या सहकारी संस्थाच्या निवडणुकांचे कामकाजासाठी प्रस्तावित करण्यात येते. काही विशिष्ट कर्मचाऱ्यांना कामकाज न देणे, त्याच त्याच कर्मचाऱ्यांना एकाच वेळी एकाहुन जादा सहकारी संस्था निवडणूकीसाठी देणे इ. बाबीच्या शिफारशी जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी कडुन होत असल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामी, निवडणुकीच्या कामकाजावर विपरीत परिणाम होतो. तक्रारी उद्भवतात किंवा निवडणुक विवाद न्यायालयापर्यंत जातात, संस्थेच्या मुख्यालयाबाहेरील निर्वाचन अधिकाऱ्यांचे नियुक्तीमुळे निवडणुकीचे कामकाजाबरोबरच संबंधितांचे दैनंदिन कार्यालयीन कामकाजात विस्कळीतपणा येण्याची शक्यता असते.

उपरोक्त दोष टाळण्यासाठी निवडणुक निर्णय अधिकारी नियुक्तीबाबत प्राधिकरणाने यापुर्वी संदर्भ क्र ५ ते ७ अन्वये प्रसिध्द केलेले निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्तीबाबतचे परीपत्रके/शुध्दीपत्रके अधिक्रमित करुन प्राधिकरणास निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्तीबाबतचे प्रस्ताव सादर करणेबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ चे नियम ३ (५) अन्वये राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास प्राप्त अधिकारानुसार निवडणुक निर्णय अधिकारी नियुक्तीबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. या आदेशाच्या परिशिष्टांमध्ये नमुद सहकारी संस्था प्रवर्गासाठी त्या प्रवर्गासमोर नमुद केलेल्या संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्याची नियुक्ती प्रस्तावित करण्यात यावी.
२. प्रस्ताव सादर करण्याच्या दिनांकास सदर अधिकारी/कर्मचारी उक्त संस्थेच्या मुख्यालयाच्या ठिकाणी अथवा निकटतम स्थानी कार्यरत आहे याची खात्री त्याचप्रमाणे सबंधीत सहकारी संस्थेच्या निवडणूकीचा पुर्वानुभव,तसेच प्रस्तावीत अधिकारी/कर्मचारी यांची सदरची निवडणूक पूर्ण करण्याबाबतची कार्यक्षमता याचा विचार करुनच प्रस्ताव सादर करण्यात यावा.
३. प्रस्तावित निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर करण्याच्या दिनांकास प्रस्तावित संस्था वगळता शक्यतोवर एकपेक्षा अधिक संस्थेचे निवडणुकविषयक कामकाज प्रलंबित नसावे.
४. प्रस्तावित निवडणुक निर्णय अधिकाऱ्याने सदर निवडणुकीपुर्वी त्यास सुपुर्त केलेल्या सर्व निवडणुकांचे अंतिम हिशोब पुर्ण करुन आवश्यकतेप्रमाणे त्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेकरीता जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी / प्राधिकरणास सादर केलेला असल्याची खात्री करुन प्रस्तावात तसे प्रमाणित करण्यात यावे.
५. निवडणुक निर्णय अधिकारी नियुक्तीबाबतचा प्रस्ताव सादर करताना त्या वर्षात म्हणजेच दिनांक ०१ जानेवारी ते प्रस्ताव सादर करण्याच्या दिनांकापर्यंत त्याने घेतलेल्या निवडणुकांची यादी सादर करावी व सदर संस्थांचे निवडणुक हिशोबाची सद्यस्थिती नमुद करावी.
६. ज्या निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांने निवडणुक कामकाजात कोणत्याही प्रकारची कसुर केलेली आहे व त्यांना भविष्यात निवडणुकीचे कामकाज देण्यात येऊ नये असे आदेश प्राधिकरणाने दिलेले आहेत अशा निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांना काळया यादीत वर्गीकृत करुन तसा अहवाल प्राधिकरणास सादर करावा व त्यांचे निवडणुक निर्णय अधिकारी म्हणुन नियुक्त करणेबाबतचे प्रस्ताव प्राधिकरणास सादर करुन नयेत.
७. प्रस्तावित निवडणुक निर्णय अधिकाऱ्यास प्रशिक्षण देण्याची जबाबदारी ही संबंधित जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांची राहिल. तसेच शिफारस केलेल्या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण झाल्याची खात्री करुनच प्रस्ताव सादर करावा.
८. जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी यांचेमार्फत सादर केलेल्या प्रस्तावात शिफारस केलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या व्यतिरिक्त अन्य अधिकारी/कर्मचारी नेमण्याचे अधिकार प्राधिकरणास राहतील.
९. 'क'वर्ग व 'ड' वर्गामधील निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्ती करताना संबधित व्यक्तीला प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या पॅनेल वरील व्यक्ती असल्याची व त्याने प्रशिक्षण घेतल्याची खात्री करुन त्यांच्या नावाची शिफारस करावी

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने.**

१५/०५/२०२०
(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति :-
१. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)
२. तालुका/प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)

# परिशिष्ट 'अ' वर्ग संस्था

| अ.क्र. | सहकारी संस्थाचा प्रकार | निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांची श्रेणी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | राज्य स्तरीय शिखर किंवा संघीय सहकारी संस्था | राज्य शासनाचे वर्ग – १ अधिकारी |
| २ | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक | |
| ३ | महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक | |
| ४ | महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ | |
| ५ | महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ | |
| ६ | महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महामंडळ | |
| ७ | सर्व सहकारी साखर कारखाने | |
| ८ | सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका | |
| ९ | सर्व सहकारी सूत गिरण्या | राज्य शासनाचे वर्ग – १ आणि वर्ग - २ अधिकारी |
| १० | मागील आर्थिक वर्षात दररोज सरासरी एक लाख लिटर किंवा त्यापेक्षा जास्त दूध संकलन असणारे सर्व सहकारी दूध महासंघ किंवा संघ | |

१५/०५/२०२०

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

## परिशिष्ट 'ब' वर्ग संस्था

| अ.क्र. | सहकारी संस्थाचा प्रकार | निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांची श्रेणी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | नागरी सहकारी बँक | राज्य शासनाचे वर्ग – १ व २ अधिकारी |
| २ | पगारदार सहकारी बँक (विभागस्तर व राज्यस्तर) | राज्य शासनाचे वर्ग – १ व २ अधिकारी |
| | पगारदार सहकारी बँक (जिल्हा क्षेत्र) | राज्य शासनाचे वर्ग – १ आणि वर्ग - २ अधिकारी |
| ३ | सर्व प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्था आणि आदिवासी कृषी सहकारी पतसंस्था | राज्य शासनाचे वर्ग – १ आणि वर्ग – २ अधिकारी, वर्ग- ३ दर्जा वर्ग – ३ मध्ये सहकारी अधिकारी श्रेणी – १, २ व सहाय्यक सहकार अधिकारी व तत्सम वेतनश्रेणीतील शासनाच्या इतर विभागातील अधिकारी . |
| ४ | सर्व सहकारी पतसंस्था ज्यांचे कार्यक्षेत्र एक जिल्हा व त्यापेक्षा जास्त आहे. | राज्य शासनाचे वर्ग – १ आणि वर्ग - २ अधिकारी आणि वर्ग – ३ मधील श्रेणी – १ कर्मचारी |
| | सर्व सहकारी पतसंस्था ज्यांचे कार्यक्षेत्र एका जिल्हयापेक्षा कमी आहे. | राज्य शासनाचे वर्ग – १ आणि वर्ग - २ अधिकारी आणि वर्ग – ३ मधील सर्व कर्मचारी (कनिष्ठ लिपीक वगळून) |
| ५ | कर्मचारी पतसंस्था (१ कोटी पेक्षा जास्त वसुल भाग भांडवल) | राज्य शासनाचे वर्ग – १ आणि वर्ग - २ अधिकारी आणि वर्ग – ३ मधील श्रेणी – १ कर्मचारी |
| | कर्मचारी पतसंस्था (१ कोटी पेक्षा कमी वसुल भाग भांडवल) | राज्य शासनाचे वर्ग – १ आणि वर्ग - २ अधिकारी आणि वर्ग – ३ मधील कर्मचारी (कनिष्ठ लिपिक वगळुन) |
| ६ | शासन अर्थ सहाय्यीत प्रकीय संस्था | राज्य शासनाचे वर्ग – २ अधिकारी व वर्ग – ३ मधील श्रेणी – १ व २ कर्मचारी |
| ७ | शासन अर्थ सहाय्यीत औद्योगिक संस्था किंवा औद्योगिक वसाहत | राज्य शासनाचे वर्ग – २ अधिकारी व वर्ग – ३ मधील श्रेणी – १ व २ कर्मचारी |
| ८ | जिल्हा / तालुका खरेदी विक्री संघ | राज्य शासनाचे वर्ग – १ आणि वर्ग - २ अधिकारी |
| ९ | जिल्हा मध्यवर्ती ग्राहक संस्था | राज्य शासनाचे वर्ग – २ अधिकारी व वर्ग – ३ मधील श्रेणी – १ व २ कर्मचारी |
| १० | सर्व सहकारी रुग्णालये आणि सहकारी शैक्षणिक संस्था | राज्य शासनाचे वर्ग – १ व वर्ग – २ अधिकारी व वर्ग – ३ मधील श्रेणी – १ व २ कर्मचारी |
| ११ | दुध संघ (१ लाख लिटर पेक्षा कमी प्रति दिनसरासरी दुध संकलन) | राज्य शासनाचे वर्ग – १ व वर्ग – २ अधिकारी व वर्ग – ३ मधील श्रेणी – १ कर्मचारी |
| १२ | इतर तालुका/जिल्हा स्तरीय संघीय संस्था ज्या अ वर्गात समाविष्ट नाही. | राज्य शासनाचे वर्ग – १ व वर्ग – २ अधिकारी व वर्ग – ३ मधील श्रेणी – १ कर्मचारी |

२५/०५/२०२०

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

# परिशिष्ट 'क' वर्ग संस्था

| अ.क्र. | सहकारी संस्थाचा प्रकार | निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांची श्रेणी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | सर्व सहकारी पतसंस्था ज्यांचे कार्यक्षेत्र एका जिल्हयापुरते आहे. | प्राधिकरणाने मंजुर केलेल्या पॅनल मधील निवडणुक निर्णय अधिकारी<br>उदा. वकील, प्रमाणित लेखापरिक्षक, लिपिक, सहाय्यक सहकार अधिकारी, सेवा निवृत्त कर्मचारी, लेखापरिक्षक वर्ग – ३ इ.<br>अ.क्र.५ करीता कनिष्ठ लिपीकही अनुज्ञेय असेल. |
| २ | कर्मचारी पतसंस्था (१ कोटी पेक्षा कमी वसूल भाग भांडवल) | |
| ३ | सहकारी गृहनिर्माण संस्था (२०० किंवा २०० पेक्षा जास्त सभासद) | |
| ४ | प्राथमिक ग्राहक भांडारे | |
| ५ | सर्व प्राथमिक सहकारी दुग्ध संस्था, ज्यांचे दैनिक सरासरी दुग्ध संकलन लगतच्या आर्थिक वर्षात १०० लिटर किंवा १०० लिटरपेक्षा जास्त आहे. | |
| ६ | सर्व विभागीय आणि जिल्हा सहकारी मंडळे | |
| ७ | सर्व प्राथमिक सहकारी पणन संस्था | |
| ८ | इतर कृषी सहकारी संस्था | |
| ९ | लगतच्या वर्षी २०० पेक्षा जास्त सभासद असलेल्या उपसा जलसिंचन आणि सहकारी पाणी वापर संस्था | |

२५/०५/२०२०

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

# परिशिष्ट 'ड' वर्ग संस्था

| अ.क्र. | सहकारी संस्थाचा प्रकार | निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांची श्रेणी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | पाणीवापर/उपसा/जलसिंचन सहकारी संस्था(२०० पेक्षा कमी सभासद | प्राधिकरणाने मंजुर केलेल्या पॅनल मधील निवडणुक निर्णय अधिकारी<br>उदा. वकील, प्रमाणित लेखापरिक्षक, लिपिक, सहाय्यक सहकार अधिकारी, कनिष्ठ लिपीक सेवा निवृत्त कर्मचारी, लेखापरिक्षक वर्ग – ३ इ |
| २ | मजुर/वन सहकारी संस्था | |
| ३ | सर्व अनुदान अप्राप्त औद्योगिक संस्था | |
| ४ | सर्व अनुदान अप्राप्त सहकारी प्रक्रिया संस्था., साखर कारखाने वगळून | |
| ५ | सर्व प्रकारच्या प्राथमिक विणकर (हातमाग आणि यंत्रमाग) सहकारी संस्था | |
| ६ | सर्व प्राथमिक दुग्ध संस्था ज्यांचे मागील वर्षात दैनिक सरासरी दुध संकलन १०० लिटरपेक्षा कमी आहे. | |
| ७ | सर्व प्राथमिक कुक्कुट, मत्स्य, वराह आणि पशुधन सहकारी संस्था | |
| ८ | स्वयं व्यवसाय सहकारी संस्था, बेरोजगार तरुणांच्या सहकारी संस्था आणि ज्या संस्थांची नोंद सर्वसामान्य संस्था हया वर्गीकरणात झालेली आहे. | |

१५/०५/२०२०

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.